महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ 35 /२०२४ दि. 06/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत श्री. तीर्थक्षेत्र पिंपळेश्वर महादेव मंदिर, डोंबिवली पूर्व येथे **'महाशिवरात्री'** निमित्त सालाबादप्रमाणे महाशिवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. गतवर्षीप्रमाणे यावर्षी दि. ०८/०३/२०२४ रोजी **'महाशिवरात्री'** निमित्त यात्रा भरणार असून दुसऱ्या दिवशी दि. ०९/०३/२०२४ रोजी महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे. या दरम्यान ७० ते ८० हजार भाविक महादेव दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण शिळ रोडने डोंबिवली पूर्व–पश्चिमकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पिंपळेश्वर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने सोनारपाडा चौक रॉयल वाईन्स समोरून सर्व्हीस रोडने ए १ आर्क वेल्ड कंपनीचे रस्त्याने साईबाबा सागाव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व येथून पिंपळेश्वर चौक, कल्याण शिळ रोडने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **व्ही. एन. एस. कंपनीसमोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मानपाडा रोडने मानपाडा चौक साईबाबा सागाव मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. ०८/०३/२०२४ रोजी रात्रौ ००:०१ ते दि. ०९/०३/२०२४ रोजी रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन बस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

CamScanner

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner